MHLA050005042024

लवाद दरखास्त क्र.१८३०/२०२४
श्रीराम फायनान्स वि.अविनाश

## नि.क्र.१९ खालील आदेश

सदर अर्ज दरखास्तदाराने देवून नमूद केले की, जाबदार क्र.१ आणि २ विरुध्द रक्कम वसुलीसाठी अनेकदा प्रयत्न करुनही रक्कम वसूल न झाल्याने त्यांची मांगदरी येथील गट क्र.३७ मधील ३१ आर जमीन जप्त करण्याचा आदेश झाला. सदर जमीन लिलाव करुन त्यातून येणारी रक्कम दरखास्तीतील रक्कमेच्या परतफेडीसाठी वापरण्यात येणे आवश्यक आहे, यासाठी दरखास्तदार याला नि.क्र.१७ लगत नोटीस काढली. ती नोटीस त्याने स्वीकारली. मात्र, विक्रीच्या उद्धोषच्या शर्ती ठरविण्यासाठी तो आला नाही, म्हणून सदर जमीन लिलावाद्वारे विक्री व्हावी यासाठी प्रस्तुत अर्ज दिला आहे.

**०२.** सदर अर्जावर जाबदाराने आजरोजी कोणतेही म्हणणे दिले नाही. तो न्यायालयात हजर झाला नाही. दावा जमिनीचा उतारा पाहता त्यात ऋणको गोविंद हरीबा केवले याच्या नावे ३१ आर जमीन आहे. ती बोजाविरहीत आहे. त्यामुळे, सदर जमीन न्यायालयीन प्रक्रियेचा वापर करुन आणि दि.प्र.संहिता क्रम २१ नियम ६६ ते ७३ मधील तरतुदींचा अवलंब करुन लिलाव करावी. लिलावातून येणारी रक्कम दरखास्तीच्या देय रक्कमेपोटी न्यायालयात जमा करावी. ती रक्कम देय रक्कमेहून जादा असल्यास उर्वरीत रक्कम ऋणको क्र.२ यांना देण्यात यावी.

स्वाक्षरीत/-
**[एस.एन.सरडे]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर

दिनांक:०४/०८/२०२६.